पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com


# <u>वार्तापत्र</u>

दिनांक ०२/०४/२०१९

## " कोरची अंतर्गत कोचीनारा व परिसरातील नागरिकांनी नक्षल बॅनर जाळुन केला लोकशाहीला विरोध करणाऱ्या नक्षलवाद्यांच्या निषेध"

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नक्षलवाद्यांनी काही ठिकाणी बॅनर लावुन दहशत माजविण्याच्या प्रयत्न केला परंतु नागरिकांच्या विरोधामुळे त्यांचा डाव पुर्णपणे फसला आहे.

कोरची तालुका अंतर्गत कोचीनारा-बुटेकसा येथील मार्गावर नक्षलवाद्यांनी लाल रंगाचे कापडी बॅनर बांधुन, लोकसभा व विधानसभा निवडणुकांवर नागरिकांनी बहिष्कार टाकावा या हेतुने लावले होते. कोचीनारा,बुटेकसा,सातपुती या परिसरातील नागरिकांच्या ही बाब लक्षात येताच त्यांनी एकत्र येवून नक्षलवाद्यांच्या लोकशाही विरोधी कृत्यांच्या निषेध करण्यासाठी बॅनर काढुन रस्त्यावर त्यांची सामुहीकरीत्या जाळपोळ करुन नक्षल विरोधी घोषणा देवुन नक्षलवाद्यांच्या या कृतीचा निषेध केला.

कोरची तालुक्यातील अनेक गावे ही नक्षलदृष्ट्या अत्यंत संवेदनशील मानली जातात नक्षलवादी अनेक वर्षापासुन या भागात आदिवासी जनतेवर दहशत ठेवून वावरत आहेत. नक्षलवाद्यांनी आतार्पंत कोणताही विकासाची कामे केलेली नाही. उलट आदिवासी जनतेवर अत्याचार करुन त्याचे बळीच घलेले आहेत. आदिवासी युवक-युवतींनी रोजगाराचे कोणतेही साधन नसतांना, नक्षलवादी त्यांना शासकीय योजनेचाही लाभ घेवु देत नाही. नक्षलवादी नेहमीच खोट्या क्रांतीची स्वप्रे दाखवुन आदिवासी जनतेची दिशाभुल करत असतात हे आदिवासी जनतेच्या लक्षात आले आहे.

नक्षलवाद्यांकडुन आदिवासीवर होणाऱ्या अत्याचारांमुळे नक्षलवाद्यांचा खरा चेहरा पुढे आला आहे. नक्षलवाद्यांच्या लोकशाही विरोधी कृत्यांच्या विरोध करीत नक्षली हिंसाचाराचा व त्यांच्या धोरणाचा निषेध करित " नक्षलावाद मुर्दाबाद " च्या घोषणा देत नक्षलवादाचा विरोध यावेळी उपस्थित नागरिकांनी केला.




Shot on Realme U1

–